# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
## Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur

NAAC Accredited-2022 'B++' Grade (CGPA 2.96)

केगाव, सोलापूर - ४१३ २५५, महाराष्ट्र (भारत)

दुरध्वनी क्र. ०२१७-२७४४७७१ / ७२/ ७३ (११ लाईन्स), फॅक्स : ०२१७-२३५१३००,

संकेतस्थळ: http://su.digitaluniversity.ac.in ई-मेल: dbee@sus.ac.in




**परीक्षा व मूल्यमापन मंडळ**

जा.क्र.पुअहोसोविसो/पवमूमं./2025/6875

दिनांक - 22 APR 2025

# परिपत्रक

प्रस्तुत विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयाचे प्राचार्य/प्राचार्या सर्व संकुल संचालक यांना कळविण्यात येते की,विद्यार्थ्यांच्या सोईच्या दृष्टीने पदव्युत्तर अभ्यासक्रमातील विद्यार्थ्याचे श्रेणीनुसार (Class Improvement) परीक्षा अर्ज हे विद्यार्थी ज्या महाविद्यालयातून अथवा विद्यापीठ विभाग/ संकुलातून उत्तीर्ण झालेले आहेत व त्या महाविद्यालयामार्फत अथवा विद्यापीठ संकुलामार्फत सदरील अर्ज विद्यापीठ परीक्षा विभागाकडे सादर करावेत.

उपरोक्त परिपत्रकानुसार आपल्या महाविद्यालयातून उत्तीर्ण झालेले विद्यार्थी श्रेणीनुसार (Class Improvement) साठी प्रवेश घेऊ इच्छितात अशा विद्यार्थ्याचे अर्ज व परीक्षा अर्ज हे पुढे दर्शविलेल्या तारखेनुसार विद्यार्थी आपल्या महाविद्यालात अर्ज सादर करतील आणि त्यानंतर सदरील अर्ज हे आपल्यामार्फत विद्यापीठाकडे सादर करावे.

सदरचे विद्यार्थी हे परीक्षा उत्तीर्ण झाल्यापासून ६ वर्षाच्या कालावधीमध्ये अशी श्रेणीसुधार परीक्षेच्या केवळ ३ संधी उपलब्ध असतील.

सदरचे अर्ज विद्यापीठाच्या संकेतस्थळ (sus.ac.in) व Application Form या अंतर्गत Application Form for Improvement & Re-Degree या लिंकद्वारे उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. विद्यार्थ्यांनी सदरील अर्जाची प्रत download करुन आवश्यक ती कागदपत्रे त्यासोबत जोडून संबंधित महाविद्यालयामध्ये फीसह जमा करणे आवश्यक आहे.

सदरचे जमा झालेल्या अर्जाचे शुल्क महाविद्यालयाने नियमीत परीक्षा शुल्काप्रमाणे Online भरुन सदरचा अर्ज व शुल्क भरलेली पावती विद्यापीठाकडील संबंधित विभागाकडे सादर करावी. सदर तारखेमध्ये कोणत्याही परिस्थितीत मुदतवाढ देण्यात येणार नाही तसेच विलंब शुल्क लागू असणार नाही.

| परीक्षा अर्ज भरावयाच्या तारखा | |
|---|---|
| नियमित शुल्कासह | महाविद्यालयाने जमा करणेसाठी |
| २३/०४/२०२५ | २५/०४/२०२५ |

तसेच या संदर्भातील नियमावली विद्यापीठ संकेतस्थावर उपलब्ध करुन दिलेली आहे. सदरची बाब आपल्या स्तरावरुन संबंधिताच्या निदर्शनास आणून दयावी. आणि आपण परीक्षेच्या कामामध्ये प्रस्तुत विद्यापीठास सहकार्य करावे.

डॉ. श्रीकांत ग. अंधारे

**संचालक**

**परीक्षा व मूल्यमापन मंडळ**

## श्रेणीसुधार (Class Improvement) करीता नियमावली/पध्दत

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयातून जे विद्यार्थी पदवीत्तर अभ्यासक्रमाची परीक्षा उत्तीर्ण (Pass) होतील, अशा विद्यार्थ्यांना श्रेणीसुधार पध्दतीचा लाभ घेता येईल. विद्यार्थ्याने ज्या महाविद्यालयातून पदवीत्तर अभ्यासक्रमाची परीक्षा उत्तीर्ण केली आहे. अशा महाविद्यालयात श्रेणी सुधार करीता अर्ज खालील दिनांकानुसार करण्यास कळविणेत येत आहे.

१. विद्यार्थी पदवीत्तर अभ्यासकमाच्या श्रेणीसुधार करीता अर्ज करतेवेळी अर्जासोबत सादर करावे लागणाऱ्या कागदपत्राचा तपशील खालीलप्रमाणे आहे

अ) पदवीत्तर अभ्यासक्रम उत्तीर्ण झालेल्या गुणपत्रिकेची छायांकित प्रती

क) नजिकच्या काळातील २ फोटो.

२. विद्यार्थ्यांना Pharmacy व Education (M.Ed) प्रवेश/परीक्षा अर्ज करतेवेळी आदा करावे लागणारे शुल्काचा तपशिल

| Sr. No. | Syallabus | Registration Rs.(Compulsory Fees) | Exam Fees Rs. (Semester Student) | Form Fees Rs |
|---|---|---|---|---|
| १. | Improvement | ८००/- | As Per Regular Student Exam Fee | १५/- |

( टिप विद्यार्थ्याने/महाविद्यालयाने (Annual) तथा (Semester) पध्दतीमधील विषयाबाबत अधिक माहितीसाठी) अ.क्र.८,९ पहावे

३. जे विद्यार्थी पदवीत्तर अभ्यासक्रमासाठी परीक्षा पास झाले आहेत. आणि ज्या विद्यार्थ्यांना श्रेणीसुधार करावायाचा आहे (Class) Improvement) अशा विद्यार्थ्यांना सदर परीक्षा उत्तीर्ण झाल्यापासून ६ वर्षाच्या कालावधीमध्ये अशी श्रेणीसुधार परीक्षा देण्यासाठी केवळ ती संधी उपलब्ध असतील.

४. जे विद्यार्थी प्रथम वेळेस श्रेणीसुधार (Class Improvement) परीक्षेसाठी प्रवेशित होतील त्यांनी नोंदणी (Registration) व परीक्षा अर्ज (Exam Form) भरणे आवश्यक आहे.

५. श्रेणीनुसार विद्यार्थ्यांना जे समकक्ष (Equivalence) विषय उपलब्ध आहेत त्या विषयाची परीक्षा देणे बंधणकारक राहील.

६. श्रेणीनुसार विद्यार्थ्यांनी परीक्षा ही सत्रनिहाय (Semester Wise) देणे बंधनकारक राहील.

७. सदर विद्यार्थ्याने श्रेणीसुधार परीक्षा ही दरवर्षी अंदाजे मार्च/एप्रिल दरम्यान होतील तथापि परीक्षा अर्ज हे अंदाजे माहे जुलै/ऑगस्ट दरम्यान भरावयाचे आहे यांची दक्षता विद्यार्थ्यांनी घ्यावी.

८. सत्रनिहाय पध्दतीनुसार (Semester Wise) पदवी प्राप्त विद्यार्थ्यांनी श्रेणीनुसार परीक्षेसाठी अभ्यासक्रमातील एकूण विषयापैकी कोणतेही ४ विषय घेऊन परीक्षा देणे बंधनकारक असून सदर विद्यार्थ्यांच्या ईच्छेनुसार २ पेक्षा अधिक विषयांमधून परीक्षा देऊ शकतो.

९. तसेच वार्षिक सत्र पध्दतीनुसार (Annual) पदव्युत्तर पदवी प्राप्त विद्यार्थ्याची श्रेणीसुधार परीक्षेसाठी अभ्यासक्रमातील एकूण विषयापैकी कोणतेही २ विषय घेऊन परीक्षा देणे बंधनकारक असून सदर विद्यार्थ्यांच्या ईच्छेनुसार २ पेक्षा अधिक विषयामधून परीक्षा देऊ शकतो. सदरच्या विद्यार्थ्यांनी श्रेणीसुधार परीक्षा ही सत्रनिहाय (Semester Wise) देणे बंधनकारक आहे.

१०. श्रेणीसुधार परीक्षेसाठी विद्यापीठाच्या प्रचलित नियमानुसार विहित मुदतीत नोंदणी करुन परीक्षा अर्ज महाविद्यालयास सादर करावे लागेल.

११. ज्या विद्यार्थ्याचे श्रेणीसुधार (Class Improvement) करीता नोंदणी करण्यात आलेली आहे अशा विद्यार्थ्याची परीक्षा व निकालाबाबतची माहीती विद्यापीठाच्या संकेतस्थाळावर उपलब्ध करुन देण्यात येईल.

१२. ज्या विद्यार्थ्यांची श्रेणीनुसार (Class Improvement) करीता नोंदणी करण्यात आलेली आहे. अशा विद्यार्थ्यांचे परीक्षेचे निकालाचे गुणतपासणी/पडताळणी व पेपरचे छायाकिंत प्रत इ. विद्यापीठाच्या प्रचलित नियमानुसार केले जाईल.

१३. श्रेणीसुधार परीक्षेमध्ये प्रविष्ठ झालेल्या विद्यार्थ्याना शिषवृती, व पारितोषिके अगरव गुणवत्ता प्रमाणपत्र मिळणार नाही.

१४. श्रेणीसुधार परीक्षेमध्ये प्रविष्ठ होवून श्रेणीसुधार करण्यास अपयशी (Fail) झाल्यास विद्यार्थ्यांन पूर्वीचे मिळालेले गुण ग्राहय धरावे.

१५. ज्या विद्यार्थ्याची श्रेणीसुधारली जाईल अशा विद्यार्थ्यांनी त्यांचा मूळगुणतत्ता (Original MarKlist) व पदवी प्रमाणपत्र (Degree Certificate) विद्यापीठ कार्यालयाकडे जमा करावे जमा न केल्यास अशा विद्यार्थ्याना श्रेणीसुधार झालेले गुणतक्ता अथवा पदवी प्रमाणपत्र दिली जाणार नाहीत.

१६. ज्या विद्यार्थी श्रेणीसुधार (Class Improvement) करीता नोंदणी करुन परीक्षेमध्ये अनुत्तीर्ण होतील अशा विद्यार्थ्यांनी पुन:श श्रेणीनुसार (Class Improvement) करीता नोंदणी (Registration) व परीक्षा अर्ज (Exam Form) भरणे आवश्यक आहे.